पुणे वन विभाग व पुणे महानगरपालिका

यांचे संयुक्त विद्यमाने

: नागरी संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रम :

प्रकल्प : मौजे वानवडी, कोंढवा, हडपसर व इतर

कार्यकारी समितीची बैठक

दिनांक १२.०६.२००९
वेळ : दुपारी ४.३० वाजता

: स्थळ :

वनसंरक्षक, पुणे वन विभाग, पुणे यांचे कार्यालय

2003- JFM

Ghyrudia

Water holes for peacocks.

Soil & water conservation (Check dams)

Some work can start.

Compound wall building

Plantation work can start

[Encroachment problems]

Corporators have send they can provide water connection.

- Put compound walls where walls are not there.

- Maharashtra Tree Protection [Mahajan sis is the chairman]

- Ramtekdi needs a compound wall SRPF would ensure monitoring protection

- site visit

- signages .....

- 19th July plantation prog and site visit.

हडपसर, वानवडी, कोंढवा इत्यादि गावच्या वनक्षेत्रात वन विभाग, पुणे व पुणे महानगरपालिकेच्या संयुक्त विदयमाने प्रस्तावित असलेला

नागरी संयुक्त वनव्यवस्थापन प्रकल्प

पुणे शहर परिसरांत वन विभागाच्या कार्यक्षेत्रांत प्रामुख्याने भांबुर्डा, पांचगांवपर्वती, वानवडी, हडपसर, बावधन, वारजे, कोंढवा इ. महत्वाची वनक्षेत्रे असून, त्याचे एकुण क्षेत्र १९६३.८७ हेक्टर उपलब्ध आहे.

सन १९९३-९४ या वर्षामध्ये शहरी वनक्षेत्राचे यशस्वी वनीकरण करण्यात आले. प्रामुख्याने भांबुर्डा ,कोथरुड व पांचगांव पर्वती, वानवडी, हडपसर या ठिकाणी वन विभागामार्फत मोठया प्रमाणात वनीकरण करण्यात आले. सदर योंजनेमध्ये मोठया प्रमाणात यश मिळाले. महाराष्ट्रातील शहरांचे मोठया प्रमाणावर नागरीकरण, लोकसंख्येत होणारी अविरत वाढ व शहराच्या परिसरांत होणारे प्रचंड औदयोगीकरण यामुळे आपल्या पर्यावरणाचा समतोल ढळून प्रदुषित वातावरण निर्माण झालें आहे. सन १९९०-९४ च्या दरम्यान पुणे शहरातील टेकडयांवर बांधकामांना दयावयाच्या परवानगीबाबत मुददा चर्चेच्या अनुषंगाने ऐरणीवर आला होता व त्यासाठी पुण्यातील नागरीकांच्यातिव्र विरोधी भावना होत्या. या सर्व धोक्याच्या सूचनांची गंभीरपणे त्वरीत दखल घेऊन महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मा.शरदचंद्रजी पवार यांच्या प्रेरणेने राज्यातील ५ प्रमुख शहरे म्हणजे पुणे, औरंगाबाद,नाशिक,अमरावती व नागपूर या ठिकाणच्या परिसरातील उजाड टेकडयांवर वनीकरण करुन हरीत प्रकल्प राबविण्याची महत्वाकांक्षी कार्यक्रम जून १९९० पासून हाती घेण्यात आला. याकरीता शासनाने प्रत्येक शहरासाठी प्रति वर्षी रुपये १ कोटी प्रमाणे रुपये २५ कोटींची तरतुद ५ वर्षासाठी करण्यात आली होती. या शहरातील हरीतीकरणाच्या कामामध्ये वन विभाग व सामाजिक वनीकरणाचा सहभाग होता. पुणे शहरामध्ये पुणे वन विभागाने वर्षवार खालीलप्रमाणे लागवडीचे उदिदष्ट पूर्ण केले.

अ.क्र.	वर्ष	लागवडीचे क्षेत्र	अंदाजे झालेला खर्च
१	२	३	४
१	१९९०-९१	३९३ हेक्टर	८४.९९
२	१९९१-९२	३५५ हेक्टर	१०३.६६
३	१९९२-९३	२५० हेक्टर	६५.९३
४	१९९३-९४	२५० हेक्टर	६४.९०
५	१९९४-९५	२५० हैक्टर	६५.३८
	एकुण	१४९८ हेक्टर	३८४.८६

या वनीकरणामध्ये वन विभागाच्या ताब्यातील वन क्षेत्राशिवाय संरक्षण विभाग व काही खाजगी संस्था यांच्याही मालकीच्या जमिनीचा समावेश होता. याशिवाय सामाजिक वनीकरण विभागाने संरक्षण विभाग व खाजगी सस्थांच्या जमिनीवर वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम राबवून वेगळयाने शहरातील जमिनीचे हरितीकरण करण्याचा कार्यभार उचलला. या योजनेमध्ये वनीकरणाबरोबरच सदर क्षेत्राभोवती लोखंडी तार कंपाऊंडचेही काम करण्यांत आले. सदर नागरी वनीकरणाचा कार्यक्रम नंतर आज १५ वर्षानंतरही चांगल्या

प्रकारे तेथे झाडोरा अस्तित्वात आहे आणि ज्या काही टेकडया हिरव्या टेकडया दिसत आहे हे त्यावेळच्या प्रयत्नाचेच फळ आहे.

तरीसुध्दा सध्याच्या बदलत्या परिस्थितीनुसार व अस्तित्वात असलेल्या झाडो-याचा विचार करुन नागरी वनीकरणासाठी मोठया प्रमाणावर कामे घेणे गरजेचे वाटते. जल व मृद संधारणाची कामे , सुधारीत वृक्ष जातींची लागवड तसेच हददीवर कायमस्वरुपी कंपाऊंड इ. प्रकारची कामे घेणे अपेक्षित आहे.

पुणे महानगरपालिकेच्या विस्तारीत हददीमुळे जवळपास १९६३.८७ हेक्टर वनक्षेत्र हे महापालिकेच्या कार्यक्षेत्रांत येते. पुणे शहरांत प्रामुख्याने भांबुर्डा, वारजे, हडपसर, वानवडी, पाचगांव पर्वती व पाषाण,कोथरुड या ठिकाणच्या टेकडयांचा व वनक्षेत्राचा समावेश होतो व या सर्व क्षेत्रांचे एकुण क्षेत्रफळ १२०५.३३ हे. आहे.

पुणे शहर व शहरालगत वन विभागाचे प्रामुख्याने भांबुर्डा, पांचगांव पर्वती, कोथरुड, वानवडी,सिंहगड,वारजे माळवाडी,कोंढवा,कात्रज व हडपसर इ.ठिकाणे वनक्षेत्र विखुरलेले आहे. या वनक्षेत्रावर वन विभागाने सन १९९०-९४ या वर्षी वृक्षारोंपणाचा कार्यक्रम राबविला व त्याद्वारे पुणे शहराच्या समृध्द पर्यावरणात भर घालण्याचा प्रयत्न केला आहे. सदर वृक्षारोंपण कार्यक्रमाची व्याप्ती व यश लक्षांत घेता सदरचे क्षेत्र नव्याने नियोजनबध्द विकासासाठी उपलब्ध असून, अधिक सुधारणांसाठी भरपूर वाव आहे. ही बाब लक्षांत घेऊन पुणे वन विभागाने नम ुद काही क्षेत्रासाठी बृहत आराखडा तयार करुन निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने पुणे महापालिका प्रशासनास विनंती केली. वन विभागास वनक्षेत्र विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने तांत्रिक दृष्टया प्रशासनाचा पाठींबा असला तरी धोरणात्मक दृष्टया मात्र कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नव्हता. पुणे वन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या वनक्षेत्राचा विकास झाल्यास पुणे शहराच्या लौकींकात मोलाची भर पडण्या बरोबरच पर्यावरण संतुलनात सुध्दा यशस्वी वाटचाल होऊन त्याचे फायदे पुणेकर तसेच पर्यटकांना मिळून आरोग्य लाभ होणार असल्याने पुणे महापालिकेने या बाबींकडे व्यापक दृष्टीकोन समोर ठेऊन वन विभागास निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्यामध्ये भांबुर्डा, वारजे व पांचगांव पर्वती येंथील प्रकल्पांचा समावेशनात होतो. सदर ठिकाणी नागरी संयुक्त वन व्यवस्थापन समिती स्थापन होऊन काम प्रगतीपथावर आहे. नागरी संयुक्त वन व्यवस्थापन स्थापन करणेबाबतचा शासन निर्णय दिनांक २५.४.२००३ रोजी झाला आहे. यामध्ये शासन, नागरीक व सेवाभावी संस्थांची कार्यकारीणी तयार करण्यात येते व त्यांच्या नियंत्रणाखाली व्यवस्थापन प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाते. सदर शासन निर्णय सोबत जोडला आहे.

भांबुर्डा व पाचगांवपर्वती नंतर त्यापुढील टप्प्यामध्ये कोंढवा खुर्द, कोंढवा बुद्रुक ,महम्मंदवाडी,वानवडी,खराडी, वडगांव -शेरी ,घोंरपडी व वारजे या आठ गावांचा नागरी संयुक्त वन व्यवस्थापन प्रकल्प राबविण्यासाठी पुणे वन विभाग व महानगरपालिका यांच्यामध्ये सामंजस्य करार दिनांक २४.६.२००८ रोजी करण्यात आला. तथापि, वन विभाग व महानगरपालिका यांच्या क्षेत्रीय कर्मचा-यांच्या माहितीप्रमाणे उंड्री येथील काही व हडपसर या गावच्या सर्व वनक्षेत्राचा या प्रकल्पात अंर्तभाव करावयाचा असून, त्याप्रमाणे सामंजस्य करार नव्याने करावा लागेल.

याबाबतीत वन विभागाच्या सुचनेनुसार 'लोटस' या व्यावसायिक संस्थेने सदर दहा गावाचा विकास आराखडा तयार करण्याचे काम सुरु केले आहे. सदर संस्थेंने या गावाच्या वन जमिनीचा सर्वे केला असून, त्यावर उपचार सुचविणार आहेत. यामध्ये वन जमिनीचा खालीलप्रमाणे समावेश करण्यात येणार आहे.

अ.क्र.	गावाचे नाव	स. न.	क्षेत्र
१.	घोरपडी	३९	३.४९
		३०	६.७९
२.	वानवडी	४८अ/१	४.०५
		४९	२५.५२
३.	वडगांव शेरी	५४	१.११
		५७	२.१३
४.	कोंढवा बु.।।	२१	११.८९
५.	कोंढवा खु.।।	३४	१३.०२
		२८	११.२३
६.	महमंदवाडी	४१	७.९०
		४५	४७.७४
		७१	९.३८
		७२	४.३७
७.	खराडी	७४	३.४२
८.	वारजे	१२०	३०.३३
९.	उंड्री	११ अ	७.०६
१०.	हडपसर	६०	८.५
		६२	७.६८
		६८	३४.६०
		१०८ अ	१२.८९
		१०९/१	१०.१०
		१०४	९.२३
		९६	२.१४
		९८	७.८४
	एकूण		२८२.४१

सदर क्षेत्रावर प्रामुख्याने खालील उपचार प्रस्तावित करणेचे आहेत.

१. सर्व्हेक्षण व सिमांकन

२. कंपाउंडची भिंत व प्रवेशद्वार तयार करणे

३. मृद व जल संधारणाची कामे

- लुज बोल्डर स्ट्रक्चर्स
- गॅबियन स्ट्रक्चर्स
- मातिचें नालाबांध,
- सिमेंट बंधारें
- कृत्रिम पाणवठे तयार करणे
- वनक्षेत्रास पाणीपुरवठा करणे
- वनीकरणाचा कार्यक्रम
- रोपवाटीका निर्मिती
- व्यावसायिक सुरक्षा दलाची मदत घेंणे इत्यादि.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र.:-एमएससी/२०००/प्र.क्र.१४३/फ-२
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २५.०४.२००३

वाचावे :- १.शासन निर्णय क्रमांक एस.एल.एफ-१०९१/प्र.क्र.११९/फ-११, दि. १६.३.१९९२
२.शासन निर्णय क्रमांक एफ.डी.एम.-१०९३/प्र.क्र.७/फ-२, दि. ८.७.१९९४
३.केंद्र शासनाचे पत्र क्र. २२.८/ २०००-जे एफएम (एफपीडी) दि. २१.२.२०००
४.केंद्रशासनाचे पत्र क्र.डीओ/२१.१.७/९९/बी-२ दि. ३१.५.२००२

निर्णय:-

राष्ट्रीय वननीती १९९८ अन्वये वनसंरक्षणामध्ये आणि वनविकासासाठी स्थानिक लोकांचा सहभाग अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाच्या पर्यावरण आणि वन मंत्रालयाने सर्व राज्य शासनांना दिनांक १.६.१९९० च्या मार्गदर्शक तत्वान्वये स्थानिक लोकांच्या सहभागाने वनव्यवस्थापन करण्यासाठी एक योजना तयार करावी. अशी सूचना केली होती. केंद्र शासनाच्या सूचनेचा विचार करुन महाराष्ट्र शासनाने ग्रामीणांच्या सहभागातून वनव्यवस्थापनेबाबत योजना राबविणेचा निर्णय घेतला आहे.

२. आता केंद्र शासनाने दिनांक २१.२.२००० व दि. ३१.५.२००२च्या मार्गदर्शक तत्वांन्वये या कार्यक्रमात चांगली वने घेणे. तसेच स्त्री वर्गाचा जास्त सहभाग प्राप्त करणे. इत्यादि बाबत सुचविलेले आहे.

३. सदर मार्गदर्शक तत्वांचा सखोल अभ्यास व विचार करुन राज्य शासनाने पूर्वी निर्गमित केलेले दिनांक १६.३.१९९२ व ८.७.१९९४ चे शासन निर्णय अधिक्रमित करुन या कार्यक्रमाबाबत खालीलप्रमाणे सुधारीत निर्णय घेतलेला आहे.

ग्रामीण परिसरातील अपगत व अवनत व वनेत्तर क्षेत्राचा उपयोग या कार्यक्रमासाठी प्रामुख्याने केला जाईल. तसेच कार्यक्रमांतर्गत वनपडिक (Forest Wet Land) ज़मिनीचा सुध्दा अंतर्भाव राहील. सदर कार्यक्रमामध्ये ४० टक्केच्या वर घनता असलेली वने (यापुढे अशा वनांना "चांगली वने" असे नमूद करण्यात येईल)ही घेण्यात येतील. सुरुवातीस २ कि.मी. अंतराच्या आत ज्या गावाचे चांगले वनक्षेत्र आहे, अशा गावांचा प्रायोगिक तत्वांवर या कार्यक्रमामध्ये अशी वने घेण्यासाठी समावेश करण्यात येईल. नंतर टप्प्या- टप्प्याने उर्वरित चांगली वने असलेल्या गावांचा विचार सदर कार्यक्रमासाठी करण्यात येईल. तथापि संरक्षित क्षेत्रे(राष्ट्रीय उद्याने व अभायारण्ये यांचा समावेश असलेली क्षेत्र) यांचा उपयोग या कार्यक्रमासाठी करता येणार नाही पुढे हे कार्यक्रम स्थानिक ग्रामपंचायतीच्या सहाकार्याने राबविले जाणार असून याद्वारे मिळणारे वनोत्पादन स्थानिकांच्या दैनंदिन गरजा भागविण्यांसाठी अग्रक्रमाने उपलब्ध करुन दिले जाणार आहे. त्यामुळे त्यांच्या हक्कांवर बंधने

रोटो/एच-263(ए)(1200-4-03)1

येऊ नयेत. म्हणून खाजगी व्यक्ती अथवा संस्था तसेच [illegible] औद्योगिक प्रतिष्ठानांना करारनाम्यानुसार दिलेले क्षेत्र या कार्यक्रमातून वगळण्यात येईल.

गावाच्या परिसरातील वनेतर क्षेत्र जर मुबलक प्रमाणात उपलब्ध असेल अथवा ते वनक्षेत्राशी सलग्न असेल व या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी या वनेतर जमिनीची गरज असेल तर अशा जमिनीचा अंतर्भावही यासाठी करता येईल. तसेच ग्रामस्थांनी व ग्रामपंचायतीने सहमती दिल्यास गट लागवडीसाठी असलेल्या क्षेत्रात ही योजना राबविता येईल. मात्र ह्यासंदर्भात ग्रामसभेमध्ये ठराव घेणे आवश्यक राहील.

स्थानिक नागरीक, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि पर्यावरण तज्ञांच्या सहभागाने तथा सहकार्याने क्षेत्रातील नागरी परिसरातील वनक्षेत्र आणि वनेतर पडिक क्षेत्रावरही वनोपजाच्या भागीदारीच्या तरतुदींविना सुधारीत रुपामध्ये या कार्यक्रमाची अंमलबजावणी करता येईल.

या कार्यक्रमाचे एक उद्दिष्ट वनाजवळ राहणाऱ्या ग्रामीणांच्या दैनंदिन वनोत्पादनाच्या गरजा भागविणे असे आहे. म्हणून या कार्यक्रमात वनक्षेत्रात जोड कृषि उत्पादन अभिप्रेत नाही. तथापि मंजूर सूक्ष्मयोजनेतील तरतुदींप्रमाणे अवनत व अपगत वनक्षेत्रात कोरडवाहू फलोत्पादनासाठी परवानगी देता येईल. तसेच सदर कार्यक्रमाचे उद्दिष्ट वन तथा वन्यप्राण्यांचे संवर्धन लोकांच्या सहभागातून अभिप्रेत असल्यामुळे वनसंवर्धन अधिनियम १९८० च्या तरतुदींना बाधा येईल असे कोणतेही करारनामे व्यक्ती, संस्था अगर ग्रामपंचायतीशी केले जाणार नाहीत.

नागरी क्षेत्रात वन आणि वनेत्तर क्षेत्रावर परिसर विकासाची कामे करण्यासाठी उपवनसंरक्षकांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त वन व्यवस्थापन (नागरी क्षेत्र) समितीची स्थापना करण्यात येईल. सदर समितीचे सभासद प्रत्येक लगतच्या वार्डातून २ पेक्षा जास्त राहणार नाहीत. या त-हेने सदस्यांची संख्या व्यवस्थापनेच्या मर्यादेत ठेवण्यात येईल.

केंद्र शासनाने दि. ३१.५.२००२ च्या मार्गदर्शक सुचनान्वये संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे गठण करण्याबाबत काही निर्देश दिले आहेत. केंद्र शासनाने सुचविल्याप्रमाणे व राज्यातील परिस्थिती विचारात घेऊन, संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे गठण करण्यात येत आहे. यानुसार संयुक्त वनव्यवस्थापन समितीमध्ये खालीलप्रमाणे दोन समित्या असतील.

१. सर्वसाधारण समिती

२. कार्यकारी समिती

<u>सर्वसाधारण समिती :-</u> मुंबई पंचायत राज अधिनियम १९५९ खाली गठीत ग्रामसभेचे सर्व प्रौढ इच्छुक सदस्य या समितीचे सदस्य राहतील. सर्वसाधारण समितीचे सर्व सदस्य निवडणूकीद्वारे अध्यक्षांची निवड करतील. अध्यक्षांचा कार्यकाल तीन वर्षाचा राहील. अध्यक्षाचे पद हे त्या त्या वर्षी ग्राम सभे मध्ये सरपंचाचे पद ज्या संवर्गासाठी आरक्षित आहे(मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ नुसार व महाराष्ट्र अधिनियम क्र.१२१, १९९४) त्याच संवर्गासाठी आरक्षित असेल. तसेच प्रत्येक संवर्गासाठी महिलाचे आरक्षण हे त्या संवर्गातील संख्येच्या १/३ या प्रमाणात असेल.

<u>कार्यकारी समिती :-</u> कार्यकारी समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

अध्यक्ष - सर्वसाधारण समितीद्वारे निवडण्यात आलेले अध्यक्ष.

सदस्य सचिव	-	संबंधित क्षेत्राचे वनपाल /वनरक्षक
कोषाध्यक्ष	-	सर्वसाधारण समितीमधील सदस्य ज्याची नियुक्ती अध्यक्ष, ग्रामसभेमधील एक वरिष्ठ सदस्य यांच्या सहमतीने सदस्य सचिव करतील.
सदस्य	-	संबंधित ग्रामपंचायतीमधील प्रतिनिधी (चक्राकार पध्दतीने)
सदस्य	-	सर्वसाधारण समितीमधून निवडणूकीद्वारे नियुक्त ६ सदस्य

<u>नागरी क्षेत्राकरिता सर्वसाधारण समिती :-</u> संयुक्त वन व्यवस्थापन (नागरी क्षेत्र) या करिता मुंबई नागरी क्षेत्र अधिनियम १९५९ प्रमाणे प्रत्येक नगरक्षेत्रातील नागरी क्षेत्रामधील सर्व इच्छुक सदस्य या सर्वसाधारण समितीचे सदस्य राहतील. यातील अध्यक्षांची निवड निवडणूकीद्वारे करण्यात येईल.

<u>नागरी क्षेत्राकरिता कार्यकारी समिती :-</u> संयुक्त वनव्यवस्थापन (नागरी क्षेत्र) समितीच्या कार्यकारी समितीची रचना पुढील प्रमाणे राहील.

१	संबंधित क्षेत्राचे उपवनसंरक्षक	-	पदसिध्द अध्यक्ष
२	जिल्हाधिकारी यांचे कार्यालये/जिल्हा पोलीस यांचे कार्यालय/ मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचे कार्यालय/महानगर पालिका यांच्या कार्यालयातील एक प्रतिनिधी (वृक्ष अधिकारी)	-	सदस्य
३	या क्षेत्रामध्ये ज्यांचे काही हितसंबध आहेत (Stake Holder) अश्यापैंकी दोन स्त्रिया	-	सदस्य
४	दोन स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी	-	सदस्य
५	संबंधित सहाय्यक वनसंरक्षक/ वनक्षेत्रपाल	-	सदस्य-सचिव
६	लगतच्या प्रत्येक वार्डातून - या क्षेत्रामध्ये ज्यांचे काही हितसंबध आहेत (Stake Holder) अशापैकी उपवनसंरक्षक यांनी नामनिर्देशित केलेल्या २ व्यक्ती	-	सदस्य

— One meeting every month (Min 6)

संयुक्त वनव्यवस्थापन समितीची नोंदणी

<u>संयुक्त वनव्यवस्थापन समितीची नोंदणी :-</u> संयुक्त वनव्यवस्थापन समितीची नोंदणी ही " संस्था नोंदणी अधिनियम, १८६०" च्या अंतर्गत करण्यात येईल. तसेच संयुक्त वनव्यवस्थापन (नागरी क्षेत्र) समितीची नोंदणी ही " मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम,१९५० " च्या अंतर्गत करण्यात येईल.

<u>संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे बचत खाते</u>

शासनाकडून प्राप्त होणा-या निधीच्या व्यवस्थापनेच्या उद्देशाकरिता राष्ट्रीयीकृत/सहकारी बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये संयुक्त बचत खाते उघडण्यात येईल. सदर खात्याचे संचालन कार्यकारी

समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव किंवा कोषाध्यक्ष या तिघांपैकी दोघांद्वारे संयुक्तपणे करण्यात येईल. सदर बचत खात्यास "सरकारी खाते " असे म्हणता येईल.

इतर स्त्रोतांकडून आणि संस्थांच्या स्वतःच्या उत्पन्नातून प्राप्त होणा-या निधीच्या व्यवस्थापनेच्या उद्देशाकरिता राष्ट्रीयीकृत / सहकारी बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये स्वतंत्ररित्या बचत खाते उघडण्यात येईल. सदर खात्याचे संचालन कार्यकारी समितीचे अध्यक्ष व सदस्य सचिव वा कोषाध्यक्ष यापैकी दोघे संयुक्तपणे करतील. सदर बचत खात्यास " संयुक्त वनव्यवस्थापन समिती खाते" असे म्हणता येईल.

<u>संयुक्त वनव्यवस्थापन (नागरी क्षेत्र) समितीचे बचत खाते</u>

नागरी क्षेत्राकरिता वरीलप्रमाणे सारख्या पध्दतीने प्राप्त होणा-या निधीच्या व्यवस्थापनेच्या उद्देशाकरिता राष्ट्रीयकृत/ सहकारी बँक किंवा पोस्ट ऑफिसमध्ये संयुक्त वनव्यवस्थापन (नागरी क्षेत्र) समितीच्या नावे बचत खाते उघडण्यात येईल. त्यांचे संचालन सदर समितीच्या अध्यक्षासह सदस्य सचिव हयांचेकडून संयुक्तपणे करण्यात येईल. राज्यशासनाचा निधी, केंद्र शासनाकडून मिळणारा निधी, जिल्हापरिषद , जिल्हाधिकारी कार्यालय, नगरपालिका आणि इतर स्त्रोतांकडून प्राप्त होणारी रक्कम सदर खात्यात जमा केली जाईल आणि तिचा उपयोग मंजूर सूक्ष्म योजनेनुसार विकास कामांसाठी केला जाईल.

<u>संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या बैठकी</u>

संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या वर्षातून कमीत-कमी दोन वेळा आमसभा आयोजित करण्यात येतील. कार्यकारी मंडळाची बैठक प्रत्येक महिन्यात कमीत-कमी एकदा घेण्यात येईल. यासाठी आमसभेतील सर्व सभासदांना ७ दिवसाची पूर्वसूचना देण्यात येईल आणि कार्यकारी समितीच्या सभेसाठी सर्व सदस्यांना ३ दिवसाची पूर्व सूचना देण्यात येईल. बैठकीचा इतिवृत्तात लगेचच विहीत नमुन्यात रजिस्टरमध्ये नोंद करुन ठेवण्यात येईल आणि त्यावर अध्यक्ष तथा सदस्य सचिवांची स्वाक्षरी केली जाईल. संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या आणि कार्यकारी मंडळाच्या सदस्यांची उपस्थिती प्रत्येक बैठकीच्या वेळी नोंदविली जाईल. महत्वाच्या धोरणात्मक बाबी व कार्यकारी मंडळाकडून केलेली काम याबाबत आमसभेमध्ये चर्चा करण्यात येईल. त्याचप्रमाणे जेव्हा आवश्यकता असेल अशावेळेस आमसभेमध्ये कार्यकारी मंडळाचे सदस्य निवडले जातील. सदर सभेचा इतिवृत्तांत संबंधित वनक्षेत्रपाल यांना पाठविण्यात येईल. कार्यकारी समिती संयुक्त वनव्यवस्थापन समितीतील सदस्यांसंबंधितची मूळ माहिती विहीत नमून्यात ठेवील. सदर माहितीची नोंदणी पुस्तके सदस्य सचिव यांचे कार्यालयात कायमची ठेवण्यात येतील.

संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या बैठकीची कार्यवाही सुरु करण्यासाठी एकूण सदस्य संख्येच्या १/३ संख्या इतकी आणि ५० टक्के स्त्री सदस्य असणे अपेक्षित राहील तसेच कार्यकारी समितीच्या बैठकीचे कामकाज सुरु करण्यासाठी ६ निर्वाचित सदस्य व त्यापैकी २ स्त्री सदस्य उपस्थित असणे आवश्यक आहे. कार्यकारी समितीच्या बैठकीकरिता सभासदांना ३ दिवसांची पूर्वसूचना देण्यात येईल.

संयुक्त वन व्यवस्थापन (नागरी क्षेत्र) समितीच्या बैठकीचे कामकाज सुध्दा वर [illegible] पध्दतीप्रमाणे चालविले जाईल. कार्यकारी समितीच्या बैठकीची कार्यवाही सुरु करण्यासाठी ४ [illegible] उपस्थित असणे आवश्यक राहील.

कार्यक्रमासाठी क्षेत्र निवडणे

कार्यकारी समितीशी सल्लामसलत करुन संबंधित सहाय्यक वनसंरक्षक, त्या संयुक्त वनव्यवस्थापन समितीला वर्ग करण्यासाठी क्षेत्र निवडतील. ज्या वनखंडाची/ सर्व्हे क्रमांकाची सीमा गावापासून ५.० कि.मी. आत आहे, असे वनखंड/ सर्व्हे क्रमांक निवडण्यात येतील. गावापासून त्या क्षेत्राचे अंतर,वनसंरक्षणाची समस्या तसेच त्या क्षेत्रापासून मिळणारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदे या सर्वांचा विचार करुन हे क्षेत्र निवडण्यात येईल आणि उपवनसंरक्षकाच्या मान्यतेनंतर निवडलेले क्षेत्र समितीला वर्ग करण्यात येईल.

संयुक्त वन व्यवस्थापन (नागरी क्षेत्र) समितीच्या कामासाठी क्षेत्राची निवड उपवनसंरक्षक आणि कार्य समितीतील इतर सदस्य यांचेमार्फत संयुक्तपणे करण्यात येईल. यासाठी वने आणि वनालगत किंवा इतर ठिकाणी असलेल्या सार्वजनिक पडिक जमीन, दलदली किंवा पाण्याखालील जमिनी जेथे उपलब्ध असतील अशा जमिनी सदर उद्देशासाठी निवडण्यात येतील.

समझोता समयलेख (Memorandum of Understanding)

क्षेत्र निवडल्यानंतर या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे पदाधिकारी आणि संबंधित वनविभागाचे उपवनसंरक्षक, यामध्ये समझोता समयलेख करण्यात येईल.त्याचा कालावधी १० वर्षांकरिता राहील.संयुक्त वन व्यवस्थापन (नागरी क्षेत्र) समितीकरिता निवडलेल्या क्षेत्राकरिता समझोता समयलेखाची आवश्यकता राहणार नाही.

सूक्ष्म योजना (Micro Plan)

१. संयुक्त वनव्यवस्थापन समिती वनविभागाच्या सहभागाने या कार्यक्रमाची सूक्ष्म योजना तयार करील. सूक्ष्म योजनेत विहीत असलेली वनसंवर्धन पध्दती प्रचलित कार्य आयोजनेनुसार विहीत करण्यात येईल.

२. वनेतर क्षेत्राकरिता मृद आणि जलसंधारण आणि वनीकरणाची कार्यप्रणाली मंजूर कार्यआयोजनेनुसार राहील.

३. सूक्ष्म योजनेचा कालावधी १० वर्षांचा राहील.

४. वेळोवेळी सुधारीत भारतीय वनसंवर्धन अधिनियम १९८० याला बाधा येवू नये याचा विचार करुन संयुक्त वनव्यवस्थापन समिती रोपवनसाठी प्रजातीची निवड करतील.

५. जैवविविधता संवर्धन आणि वनौषधी संवर्धन हा सूक्ष्म योजनेचा एक महत्वाचा भाग राहील.

सूक्ष्म योजनेला मान्यता देणा-या समितीचे गठण खालीलप्रमाणे राहील.

१	वनसंरक्षक(प्रादेशिक) (दोन्ही वनसंरक्षक यामध्ये जेष्ठ अधिकारी अध्यक्ष राहतील)	-	अध्यक्ष
२	वनसंरक्षक (कार्य आयोजना)	-	सदस्य
३	उपवनसंरक्षक (कार्यआयोजना)	-	सदस्य
४	२ कार्यकारी समितीचे समासद	-	सदस्य
५	या क्षेत्रामध्ये ज्यांचे काही हितसंबंध आहेत अशा २ व्यक्ती	-	सदस्य
६	उपवनसंरक्षक (प्रादेशिक)	-	सदस्य
७	उप संचालक, सामाजिक वनीकरण	-	सदस्य
८	उपवनसंरक्षक (वन्यजीव)	-	संमिलीत केलेले सदस्य
९	विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित	-	संमिलीत केलेले सदस्य

सूक्ष्म योजनेतील विभागाच्या मंजूर कार्यआयोजनामध्ये विचलन असेल तर तिच्या अंमलबजायणीपूर्वी ते विचलन सक्षम प्राधिका-याकडून मंजूर करून घेतले जाईल. दर पाच वर्षांनी सूक्ष्म योजनेचा आढावा घेतला जाईल. आवश्यक असेल तर वनविभागाच्या मंजूर कार्यआयोजनेप्रमाणे व वरील समितीच्या मान्यतेने त्यामध्ये बदल करण्यात येतील.

नागरी क्षेत्रासाठी कार्यकारी समितीकडून सूक्ष्म योजना तयार होईल आणि खाली दर्शविलेल्या समितीकडून मंजूरी घेतली जाईल.

१	वनसंरक्षक	-	अध्यक्ष
२	उपवनसंरक्षक (प्रादेशिक)	-	सदस्य- सचिव
३	उपवनसंरक्षक (कार्यआयोजना /वन्यजीव)	-	सदस्य
४	उपसंचालक (सामाजिक वनीकरण)	-	सदस्य
५	दोन स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी	-	सदस्य
६	या क्षेत्रामध्ये ज्यांचे काही हितसंबंध आहेत (Stake Holder) अशापैंकी दोन स्त्रिया	-	सदस्य
७	जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय, जिल्हा परिषद आणि महानगरपालिका/ नगरपालिका कार्यालयातील प्रत्येकी एक सदस्य	-	सदस्य

सदर तयार केलेल्या सुक्ष्म योजनेच्या तरतुदीमध्ये वनसंवर्धन अधिनियम तथा इतर वन कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन होयू नये याबाबत खात्री केली जाईल.

संयुक्त वनव्यवस्थापन समितीतील सदस्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे राहतील.

अ)संरक्षण :- समितीच्या सभासदांमार्फत वनक्षेत्र व रोपवन क्षेत्राच्या संरक्षणासाठी स्थानिकरित्या कौशल्य असलेली पध्दत ठरविणे आणि महिन्यातून कमीत कमी एक दिवस पुनरुत्पादन व संवर्धनासाठी श्रमदान करणे. सदर क्षेत्रात नियमित गस्त करणे.

ब)प्रतिबंध (Prevention):- वनक्षेत्र व रोपवनक्षेत्रात अवैध वृक्षतोड अतिक्रमण, आगी, अवैध चराई यापासून नुकसानीबाबत प्रतिबंधात्मक कार्यवाही करणे आणि गुन्हेगारांची नावे व तपशील वनअधिका-यास अवगत करणे. भारतीय वन अधिनियम १९२७, वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ वनसंवर्धन अधिनियम १९८० आणि वनाशी संबंधित इतर नियम व अधिनियमाप्रमाणे वनगुन्हयाचे कामी गुन्हेगारास अटक करण्यास, पकडण्यास व कायद्यांतर्गत कार्यवाही करण्यासाठी वनअधिका-यांना सहाय्य करणे. त्याचप्रमाणे वनसंवर्धन व वन्यजीव व्यवस्थापनाच्या संदर्भात गुन्हयांचा प्रतिबंध, शोध तसेच नियंत्रणामध्ये वनअधिका-यांची मदत करणे.

क)संयुक्त वनव्यवस्थापन :- सूक्ष्म योजनेप्रमाणे वर्ग केलेल्या क्षेत्राचे व्यवस्थापन करणे, वनविषयक कामे सुरळितपणे व वक्तशीरपणे पार पाडण्यास वनअधिका-याची मदत करणे. संबंधित वनअधिका-यास वनविषयक कामासाठी कामगार मिळविण्यास व वनव्यवस्थापन करण्याकामी त्यांना सहाय्य करणे. वनविभागाने नेमून दिलेली कामे करणे.

ड)जागृती निर्मिती :- ग्रामीण जनतेमध्ये वनांच्या महत्वाविषयी जागृती निर्माण करणे.

इ)उपलब्ध असलेल्या वनोपजाची वाटणी :- वनविभागाला वनउपजाचे निकासी व संग्रहणाचे कामी सहाय्य करणे. संबंधित अधिका-याला सभासदास कार्यकारी समितीने तयार केलेल्या व उपवनसंरक्षक हयांनी मंजूर केलेल्या यादीप्रमाणे वनोपज वाटप करण्यास सहाय्य करणे. वाटप केलेल्या वनोपजाचा कोणत्याही सभासदाकडून दुरुपयोग केला जात नाही, हयाची खबरदारी घेणे.

फ) वार्षिक लेखा परिक्षण :- संयुक्त वन व्यवस्थापन समितीला प्राप्त झालेल्या तसेच खर्च केलेल्या रकमेबाबत, लेखापरिक्षण करुन घेण्यासाठी सर्वसाधारण समितीच्या मान्यतेने लेखापरिक्षक नियुक्त करण्यात येईल. या संदर्भात संस्था नोंदणी अधिनियम १८६० मधील नियमांच्या अधीन राहून व शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या नियमांना अनुसरुन कार्यपध्दती अवलंबण्यात येईल. लेखापरीक्षकाच्या नियुक्तीबाबत कार्यकारी समिती प्रस्ताव ठेवेल व सर्वसाधारण समिती मान्यता देईल.

कार्यकारी समितीचे कर्तव्य तथा जबाबदाऱ्या

अ) सयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सर्व निर्णयांप्रमाणे व्यवस्थापनेसाठी आणि अंमलबजावणी करण्यासाठी कार्यकारी समिती जबाबदार राहील.

ब) समितीतील सदस्यत्व, वनसंरक्षण, वाद मिटविणे फायद्याची वाटणी इत्यादीच्या संबंधित सर्व महत्वाच्या विषयावरील कार्यपध्दती संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या सल्ल्याने कार्यकारी समिती ठरवतील.

क) शासनाकडून प्राप्त होणा-या निधीचे व इतर स्त्रोताच्या व निधीच्या वनविभागाच्या पध्दतीप्रमाणे लेखा व व्यवस्थापनेची जबाबदारीही कार्यकारी समितीची जबाबदारी राहील.

संयुक्त वनव्यवस्थापन समिती आणि तिच्या सदस्यांना मिळणारे फायदे

वर्गीकृत क्षेत्रापासून अकाष्ठ वनोत्पादनाचे फायदे

समझोता समयलेखावर सही झाल्यानंतर संयुक्त वनव्यवस्थापन समिती आणि तिच्या सभासदांना अकाष्ठ (Non- Timber Forest Produce) वनोत्पादनाचे फायदे उपलब्ध होतील. तथापि जेव्हा एखादी व्यक्ती किंवा कुटुंबाने वनसंरक्षणाच्या योजनेत जेव्हा आवश्यक असेल तेव्हा भाग घेण्यास नकार दिला तर अशा व्यक्तीस अथवा कुटुंबास या योजनेखाली कोणतेही फायदे मिळणार नाहीत. अनुसुचित क्षेत्र वगळून इतर वनक्षेत्रात काही इजा न करता प्रजातीची फळे, फुले, बीज (काजू वगळून) व पाने (तेंदू व आपटा पाने वगळून) संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या सभासदास त्यांच्या घरगुती उपयोगासाठी संयुक्त वनव्यवस्थापन समिती ठरविल त्या सवलतीचे दराने वा त्याप्रमाणात दरवर्षी जेव्हा उपलब्ध होईल तेव्हा प्राप्त करता येईल.

१) मोहाची फुले	१७) निर्मळ/कपी
२) मोहाची फळे	१८) गुग्गळ
३) गोंद	१९) बापची बी
४) हिरडा	२०) कुंचला कारी
५) चारोळी	२१) शिकाकाई
६) आवळा	२२) रिठा
७) नीम बीज	२३) बीब्बा
८) कारंज बीया	२४) गुंज बी
९) बेहळा	२५) ब्रुम ग्रास
१०) अमलताश बीया	२६) आंबा बी
११) चिंच	२७) वावडींग
१२) चिंचेच्या बिया	२८) वाफळी
१३) पळस बिया	२९) कापलेले गवत आणि चैरण
१४) कुसुम बिया	३०) मध

१५) धानेरंद बिया

१६) ताकाडा/पौंडा

३१) पळसाची पाने

३२) सिताफळ

३३) काजूगर-महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित यांनी केलेली लागवड वगळून

तसेच सभासदांना पुरवठा केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या या वनोत्पादनाची विक्री संयुक्त वनव्यवस्थापन समिती करु शकतील व विक्री किंमत प्राप्त करुन शकतील. मात्र अनुसुचित क्षेत्रामध्ये महाराष्ट्र अनुसुचित क्षेत्रातील गौण वनोत्पादनाच्या मालकीचे हस्तांतरण व महाराष्ट्र गौण उत्पादन (व्यापाराचे विनियम) (सुधारणा) अधिनिमय १९९७ याचे पूर्णपणे अनुपालन करण्यात यावे.

अनुसुचित क्षेत्रामध्ये (राष्ट्रीय उद्याने व अभायारण्य यांचे क्षेत्र वगळून) वरील ३३ वनोपजांची मालकी संबंधित ग्रामपंचायतीची आहे. तथापि ग्रामपंचायातीला वाटल्यास ग्रामसभेमध्ये ठराव पारित करुन हया वनोपजाचे संकलन करण्याचे त्या गावाच्या संयुक्त वनव्यवस्थापन समितीला एकावेळी १० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीकरिता प्राधिकृत करु शकते. ज्या वनोपजाच्या खरेदीचे अधिकार केवळ महाराष्ट्र आदिवासी विकास महामंडळाकडेच आहेत, त्या वनोपजांची विक्री लाभार्थींना/ संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांनी आदिवासी विकास महामंडळास करावी.

<u>रोपवन व अवनत/ चांगल्या वनक्षेत्रामधील अंतिम व अंतरिम तोडीचे फायदे</u>

संयुक्त वनव्यवस्थापन समितीला त्यांना वर्ग केलेल्या क्षेत्रांचे संरक्षण केल्यास त्यातील उत्पादनाबाबत सदस्यांना खालील फायदे मिळणार आहेत.

संयुक्त वनव्यवस्थापन समिती गठित झाली त्यावेळी असलेल्या वृक्षाच्या वाढीबाबत आधारभूत माहितीचा विचार करुन तोडीच्या वेळेपर्यन्त आल्र्ण्यात आलेली इमारती माल जळावू लाकूड आणि बांबू यांची झालेली १०० टक्के वाढ (Incremental Volume) या प्रमाणात संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या सदस्यांना देण्यात येईल. समिती गठीत झाली त्यावेळची आधारभूत माहिती उपलब्ध नसेल तर वनसंरक्षक (प्रादेशिक) हे उपवनसंरक्षक (प्रादेशिक) आणि उपवनसंरक्षक (कार्यआयोजना) यांच्या सल्ल्याने ठरवतील.तथापी सदर वनोपजाचे फायदे चांगल्या वनांमध्ये २०% पेक्षा जास्त व अपगत वनांमध्ये ५०% पेक्षा जास्त असणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

<u>नमूद केलेले फायदे संयुक्त वनव्यवस्थापन समितीला खालील पध्दतीप्रमाणे नमूद केल्याप्रमाणे मिळतील.</u>

घरगुती गरजाप्रमाणे वनोपज राखून ठेवले जाईल आणि त्या वनोपजाचे वितरण संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या सर्व सभासदांना कार्यकारी समिती व वनविभाग यांनी संयुक्तरित्या ठरविलेले मापदंड व दरानुसार वाटप करण्यात येईल. त्यानंतर राहिलेल्या शिल्लक वनोपजाची विक्री वनविभागामार्फत जाहीर लिलावाने करण्यात येईल. त्या लिलावात प्राप्त होणा-या निव्वळ विक्री रक्कमेपैकी (निकासी खर्च, वाहतूक खर्च, आगारावरील व्यवस्थापन खर्च, लिलाव खर्च, विक्रीकर, वनविकास कर, आयकर कर इ. वजा जाता) ५० टक्के रक्कम संयुक्त वनव्यवस्थापन समितीस रोख

दिली जाईल आणि उर्वरित ५० टक्के रक्कम सूक्ष्म योजनेनुसार वर्ग केलेल्या क्षेत्राच्या विकासाकरिता वनविभागामार्फत खर्च केली जाईल.

सामाजिक वनीकरणाच्या रोपवन तोडीपासून मिळणारे फायदे

सामाजिक वनीकरण योजनेंतर्गत घेतलेले गट लागवड क्षेत्र या कार्यक्रमांतर्गत घेतल्यास त्यापासून मिळणा-या उत्पन्नाचे वाटप ग्रामपंचायत व शासन यांचेमध्ये ९० टक्के व १० टक्के या प्रमाणात शासनाचे दि. १७ सप्टेंबर १९८२ च्या शासन निर्णयान्वये करण्यात येईल. ग्रामपंचायतींना मिळालेल्या रक्कमेच्या २५ टक्के रक्कम वनांच्या संरक्षणाच्या कामांवर खर्च करावयाची आहे. याशिवाय एकूण उत्पन्नाच्या ५० टक्के वनोपज स्थानिक जनतेस आरक्षित केले जावे व त्याची बाजारभावाच्या ५० टक्के इतक्या भावाने विक्री भूमिहीन मजूर व दारिद्र्य रेषेखाली असणा-या व्यक्तींना करावी. उरलेल्या उत्पन्नाची विल्हेवाट लिलावामार्फत केली जाईल आणि हा लिलाव गावातील रहिवाश्यापुरताच मर्यादित राहील. भूमिहीन मजूर व दारिद्र्य रेषेखाली असलेल्या मजुरांच्या गवताची व सरपणाची गरज किती आहे याचा अंदाज पध्दतशिररित्या करण्यात यावा. वनोपजाचा पुरवठा गरजेपेक्षा कमी पडल्यास त्याचे वाटप गुणवत्तेवर करण्यात यावे.

संयुक्त वनव्यवस्थापन समितीला वर्ग केलेल्या क्षेत्रात घडलेल्या वनगुन्हा प्रकरणात संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या साहयाने गुन्हेगार पकडले गेल्यास त्या प्रकरणात गुन्हेगारांपासून प्राप्त झालेल्या नुकसान भरपाई/ अर्थदंडाची ५० टक्के पर्यन्त रक्कम संयुक्त वनव्यवस्थापन समितीला देण्यात येईल. अशी जमा झालेली रक्कम ग्रामविकासावरच संयुक्त वनव्यवस्थापन समितीने ठरविल्याप्रमाणे खर्च करण्यात येईल. तसेच गुन्हेगारांकडून अर्थदंडाच्या वसुलीसाठी समितीतील ज्या सभासदांनी प्रत्यक्ष भाग घेतला असेल अशा सभासदांना संयुक्त वनव्यवस्थापन समिती बक्षीस मंजूर करु शकतील.

चराई वरील नियंत्रण

संयुक्त वनव्यवस्थापन समितीला वर्ग केलेल्या क्षेत्रात अनियंत्रित चराई करु देता येणार नाही. तथापि जेव्हा अत्यंत आवश्यक असेल तेव्हा काही क्षेत्र कुरण विकासाकरिता वेगळे राखून तेथे संयुक्त वनव्यवस्थापन समितीने निश्चित केलेल्या दरानुसार त्या क्षेत्राच्या वहन क्षमतेपर्यन्तच आवर्तनीय चराईकरिता परवानगी देण्यात येईल आणि इतर क्षेत्राकरिता संयुक्त वनव्यवस्थापन समितीने निश्चित केलेल्या दरानुसार " कापणे आणि नेणे" या तत्वावर गवत नेण्याकरिता परवानगी देण्यात येईल. जे ग्रामस्थ त्यांचे पाळीव गुरांचे स्वच्छीकरण करुन त्यांना गोठयामध्येच चारा घालतील अशा ग्रामस्थांना संयुक्त वनव्यवस्थापन समितीने निश्चित केल्याप्रमाणे प्रोत्साहन देण्यात येईल.

सदस्यत्वाची बरखास्ती समितीची मान्यता काढणे, अपील इत्यादी

अ) संयुक्त वन वनव्यवस्थापन समितीची मान्यता रद्द करणे :-

संयुक्त वन व्यवस्थापन समिती/ कार्यकारी समितीच्या सदस्याने वनासंबंधी अधिनियम नियम व अन्य तरतुदींचे उल्लघंन केले असेल, तर अशा सभासदाचे सदस्यत्व रद्द करण्याचे अधिकार

वनसंरक्षक/मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांना राहील परंतु सदस्यत्व रद्द करतांना नैसर्गिक तत्वाचे पालन करण्यात यावे व अशा व्यक्तीला वनोपजाचे कोणतेही फायदे मिळू नयेत अशी दक्षता ते घेतील. या निर्णयाविरुध्द अपील करावयाचे झाल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० मधील नियमांच्या अधीन राहून प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे कडे अपील करु शकतील.

ब) १. एखादी संयुक्त वन व्यवस्थापन समिती किंवा त्यांचे सभासद वनासंबंधी अधिनियम किंवा नियम याखाली तरतुदीचे वारंवार उल्लघंन करत असल्यास, त्या समितीची मान्यता/ नोंदणी रद्द करण्यासाठी मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (प्रादेशिक वृत्त) हे संस्था नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत कलम व नियमांच्या नोंदणी रद्द करण्याबाबत निबंधक यांना शिफारस करतील.

२. किंवा संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सर्वसाधारण समितीच्या बैठकीमध्ये ३/५ सदस्यांच्या बहुमताने ठराव मान्य झाल्यास, संस्था नोंदणी अधिनियमाच्या नियम १३ व १४ च्या अधीन राहून संस्थेचे विसर्जन (Dissolution) करता येऊ शकेल.

वाद मिटविणे

संयुक्त वनव्यवस्थापन कार्यक्रमाच्या सदर शासन निर्णयान्वये अंमलबजावणी करतांना कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास, त्याबाबतचा निर्णय संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या नियमांच्या अधीन राहून निर्णय घेण्यात येईल.

नियमांमध्ये सुधारणा करणे

संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या उप अधिनियमांमध्ये काही सुधारणा करावयाची झाल्यास त्याबाबतचा निर्णय, समितीच्या सभेमध्ये ३/५ बहुमताद्वारे व संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या नियमानुसार तसेच राज्य शासन व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांच्या अधीन राहून त्याप्रमाणे करण्यात येईल.

संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतील निरीक्षण व मार्गदर्शनाकरीता राज्यस्तरीय सुकाणू समिती

संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमांच्या अंमलबजावणी करताना उदभवणारे अनेक प्रश्न सोडविण्यासाठी व संयुक्त वन व्यवस्थापन समित्या सुरळीतपणे काम करतील यांची खात्री करण्यासाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक महाराष्ट्र राज्य नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली पुढे नमूद केल्याप्रमाणे राज्यस्तरीय सुकाणू समिती गठीत करण्यात येत आहे.

१ प्रधान मुख्य वनसंरक्षक अध्यक्ष
२ अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (विकास) सदस्य
३ अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन) सदस्य
४ मुख्य वनसंरक्षक (संरक्षण) सदस्य
५ मुख्य वनसंरक्षक (मूल्यांकन) सदस्य
६ मुख्य वनसंरक्षक (धोरण व तंत्रज्ञान) सदस्य
७ उप वनसंरक्षक (संयुक्त वन व्यवस्थापन) सदस्य सचिव

महाराष्ट्रांचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(अ.ना. त्रिपाठी)
उपसचिव
महसूल व वन विभाग

प्रतिलिपी

१) मा.मुख्य मंत्र्याचे सचिव
२)सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३)मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
४) महाराष्ट्र शासनाच्या सर्व संबंधित प्रशासकीय विभागांचे प्रधान सचिव व सचिव
५)प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
६)प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
७) संचालक, सामजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे
८) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
९)मुख्य वनसंरक्षक (सर्व)
१०)सर्व विभागीय आयुक्त
११)वनसंरक्षक(सर्व)
१२)जिल्हाधिकारी(सर्व)
१३)मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद(सर्व)
१४)प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा(सर्व)
१५)उपवनसंरक्षक (सर्व)
१६)जिल्हा विकास अधिकारी(सर्व), जिल्हा कृषि अधिकारी/ मृदसंधारण अधिकारी (सर्व)
१७) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (सर्व), जिल्हा आदिवासी कल्याण अधिकारी (सर्व), जिल्हा उद्योग अधिकारी (सर्व).
१८)जिल्हा सार्वजनिक आरोग्य अधिकारी
१९)सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग(वन कक्ष)
२०) निवडनस्ती , फ-२ कार्यासन,महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२

पुणे महानगर पालिका हद्दीतील वनक्षेत्र.



संदर्भ

१.	पुणे वन विभागाची हद्द व मुख्यालय	
२.	वनपरीक्षेत्र हद्द व मुख्यालय	
३.	वनक्षेत्र	
४.	राष्ट्रीय महामार्ग	
५.	राज्य महामार्ग	
६.	प्रमुख जिल्हा महामार्ग	
७.	नदी	
८.	रेल्वे	
९.	वन विभागाची विश्रामगृहे	
१०.	वनपरीमंडल मुख्यालय	
११.	नियतक्षेत्र मुख्यालय	
१२.	महानगरपालिका हद्द	

१३. वनक्षेत्र धारिणारे गावे

पुणे वन विभाग व पुणे महानगरपालिका

यांचे संयुक्त विद्यमाने

नागरी संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रम

प्रकल्प :- पांचगाव पर्वती (तळजाई टेकडी)

क्षेत्र - २३९.०० हेक्टर

कार्यकारी समितीची बैठक

दिनांक १२-०६-२००९ रोजी

दुपारी ३.३०वाजता

स्थळ

वनसंरक्षक, पुणे वन विभाग, पुणे.

Talyai – trenches are not done well

Plant these new trees by Mahajan sir

Subhash Jagtap (corporator)

14th August – Plantation ~~sche~~ prog

Increase people's participation (Smruti upvan)

~~cutting~~ thinning of some areas (Glyricidia)

3 tanks to be made –

100 ha target

विषय क्रमांक ०१ - माहे मार्च २००९ अखेर झालेल्या भौतिक व आर्थिक कामाचा आढावा

(१) वर्ष	२००८	२००९
(२) प्राप्त अनुदान	---	१ कोटी

अ.क्र.	कामाचा तपशिल	झालेल्या कामाचे परिमाण		एकूण
		क्षेत्र	संख्या	
	सन २००८-०९			
अ	**वृक्ष लागवडीची कामे**			
१	लावलेल्या रोपांची संख्या	५ हेक्टर	१५५०	७०,४३६
ब	**मुद व जलसंधारण कामे**			
१	१ x ०.५० मी. आकाराचा मोठा जलशोषक चर		१००० र.मी.	५५,३६४/-
			एकूण	**१,२५,८००/-**
२	लुज बोल्डर स्ट्रक्चर		१५६	५,२२,५१२/-
३	अ) पुष्करणी तलावाची दुरुस्ती (१५ x २० x २ मीटर) अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २,१८,०३९/- ब) निसर्ग केंद्रा जवळील कृत्रिम प्राणी ठेवलेल्या ठिकाणचे तळे अंदाजपत्रकीय रक्कम रु.२,७४,९०२/-		काम ८०% पुर्ण काम पुर्ण	पेमेंट बाकी पेमेंट बाकी
क	**रोपवाटीका**			
१	तयार करण्यांत आलेली रोपे २००९ चे पावसाळयासाठी रोपे तयार केली		५०००	२५,१८०
ड	**आर.सी.सी.संरक्षण भिंत**			
१	टेंडर क्र. ०१ - यशवंत कंन्स्ट्रक्शन टेंडर रक्कम रु ३६,२५,३२८/-	८१४ र.मी.	८० र.मी.	पेमेंट अदा केलेले नाही
२	टेंडर क्र. ०२ - श्रीराम कंन्स्ट्रक्शन टेंडर रक्कम रु ५७,८९,९६१/-	१२७१ र.मी.	४५० र.मी.	पेमेंट अदा केलेले नाही
ई	**इतर कामे**			
१	मजूर कल्याण साहित्य पुरवठा कार्यालयीन खर्च पक्षी व रोपांसाठी पाणी पुरवठा इ.			१,४२,९९८/-
२	निविदा प्रसिध्दी - जाहिरात खर्च			१८,१५२/-
			एकूण	**८,३४,६४२/-**

विषय क्रमांक ०२ -

पांचगाव पर्वती येथे मंजूर आराखडयानुसार सन २००९-१० या आर्थिक वर्षात करावयाच्या कामाचे नियोजन

अ.क्र.	तपशिल	परिमाण	अंदाजित खर्च
१	२	३	४
१	**वनीकरण**		
	अ) २००९ च्या पावसाळयांत करावयाचे वनीकरण ०.६० मी. X ०.६० मी. आकाराचे खड्डे खोदणे, खडयामध्ये पोयटा माती बाहेरुन आणून खड्डे भरणे व १ मी. उंचीची स्थानिक प्रजातींची (निम, वड, पिंपळ, उंबर, करंज, आवळा, चिंच, सिताअशोक, शिशम इ.) रोपे लागवड करणे.	३१५० रोपे	१२,६०,०००/-
	ब) निसर्ग केंद्र ते पुना पॉईंट १ कि.मी. रस्त्याचे दुतर्फा १ मी. X १ मी. आकाराचे खड्डे घेणे पोचरा माती बाहेरुन आणुन खड्डे भरणे व १ मी. उंचीची स्थानीक प्रजातींची फुडझाडे लावणे (बहावा,पळस व जॅकरांडा)	३०० रोपे	१,२०,०००/-
	क) २००७ व २००८ च्या पावसाळयांत लावलेली एकूण १५५० रोपांमधील मेलेल्या रोपांमधील मरअळी भरणे -	१०० रोपे	१५,०००/-
२	**आर.सी.सी. संरक्षण भिंत करणे**		
	अ) फेज - १ आतापर्यंत झालेले काम	५३० र.मी.	पेमेंट अदा केलेले नाही
	ब) फेज - २ २००९-१० च्या वर्षात करावयाची सिमाभिंत चेनेज १. ५४५ ते ५८५ व ६०५ ते ६५५ - ८० २. ६५५ते ६९९ व ७१७ ते ७६३ - ९० ३. ७६३ ते १२५३ - ३२० ४. १९१३ ते २६३३ - ७२० ५. ७७७५ ते ७९१० - १३५ १३४५ र.मी.	१३४५ र.मी.	१,०९,२७,५६०/-
	क) फेज - ३ मध्ये प्रस्तावित कामाची लांबी २६३३ ते ७७७५ - ५१४२ र.मी.	५१४२	१,७०,६७,०६९/-
३	**निरिक्षण पथ** - (अस्तित्वात असलेले रस्ता दुरुस्ती) प्रवेश द्वार ते धनकवडी बाजूकडील रस्ता	१ कि. मी.	५,००,०००/-/-
५	**नागरीकांसाठी सुखसोयी -**		
	अ) निसर्ग निर्वाचन केंद्र, पुना पॉईंट इ. ठिकाणी फिरावयास येणा-या नागरीकांसाठी बसण्यासाठी दगडी कट्टे तयार करणे (seat out)		
	ब) स्वच्छतागृहाची व्यवस्था करणे		
६	**सुरक्षा व्यवस्था -**		
	अ) वॉच टॉवर बांधणे	२	~~१६,००,०००/-~~
	ब) वनक्षेत्रामध्ये फिरतीसाठी सुरक्षा रक्षक नेमणे - पांचगाव पर्वती येथील वनक्षेत्रामध्ये खालील ठिकाणी प्रायोगिक तत्वावर दिवसा एकूण १० सुरक्षा रक्षक व रात्रपाळीसाठी ५ सुरक्षा रक्षक पुना पॉईंट परिसर, जनता वसाहत परिसर,धनकवडी परिसर, सिंहगड कॉलेज परिसर	१५	७,५६,०००/-
७	माहिती फलक तयार करणे व तत्सम कामे		५,००,०००/-

Increase list of Trees list

not Indigenous

Pangara Rock breaking
Kanchan
Beeja
Apta - Rock breaking

Shirish
Kadamba
Shami
Moh
Jamun
Khair
Waavas
Medshingi
Saalai &
Mui
Phanshi
Nandruk

विषय क्रमांक ०३ - प्रकल्पाबाबत सदस्यांच्या सुचना/प्रस्ताव व त्यावर चर्चा.

LAYOUT PLAN



CONTENT : PROVIDING R.C.C. COMPOUND WALL & W.B.M. PATHWAY AROUND FOREST AREA AT PACHGAON- PARVATI

PROJECT: PROPOSED LAYOUT OF ECO-PARK AT PACHGAON PARVATI FOREST, PUNE

SCALE : NTS

ARCHITECTS
LOTUS ENVIRONMENTS PUNE